Ex.1-C

दै.रजि. नं. /२०२६
फिर्याद दा.ता. / /२०२६

समरी क्रि.के.नं. 95 /२०२६

## मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल यांचे कोर्टात ....

**श्री. विलास केशव पाटील,**
व.व.५२, धंदा – शेती,
रा. माद्याळ, ता. कागल, जि. कोल्हापूर } फिर्यादी

विरूद्ध

**विद्या विजयकुमार पाटील,**
व.व.४७, धंदा – व्यवसाय,
रा. श्रीकृष्ण कॉलनी, संभाजीनगर, कोल्हापूर } आरोपी

**निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् ॲक्ट कलम १३८ प्रमाणे फिर्याद :**

**यातील फिर्यादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितात की :**

१) यातील फिर्यादी यांचे व आरोपी यांचे सासरे कै. श्रीपती काशिबा पाटील व आरोपी यांचे कुटुंबाचे मैत्रीचे संबंध होते व आहेत. सदरचे मैत्रीचे संबंधामुळे यातील फिर्यादी व आरोपी यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाल्याने घरी येणे–जाणे होते व आहे.

Order
---------------
Put up for Verification and Argument

I/c.J.M.F.C. Kagal
dt.18/02/26

२) यातील आरोपी यांनी फिर्यादी यांचेकडे कौटुंबिक अडचणीकरीता व आत्मगरजेपोटी व मुलांचे शिक्षणाकरीता फिर्यादी यांचेकडे हातउसणे रोख रक्कम रू. ४,५०,०००/— (अक्षरी रक्कम रू. चार लाख पन्नास हजार फक्त) ची मागणी केली. आरोपी यांचे मागणीनुसार फिर्यादी यांनी आरोपी यांना वेळोवेळी रोख रक्कम रू. रक्कम रू. ४,५०,०००/— (अक्षरी रक्कम रू. चार लाख पन्नास हजार फक्त) दिलेले आहेत. सदरची रक्कम आरोपी यांनी फिर्यादी यांना दोन महिन्याचे मुदतीत परत करणेची हमी दिलेली असून सदर व्यवहाराचे मोबदल्यात राजे विक्रमसिंह घाटगे को–ऑप. बँक लि. कागल, शाखा – लक्ष्मीपुरी, कोल्हापूर या बँकेचा दि.२९/१२/२०२५ इ. रोजी चेक नं. ०१२३७० व चेक नं. ०१२३७१ असे दोन चेक दिलेले आहेत. सदरची रक्कम रोख स्वरूपात न दिलेस सदरचे दोन्ही चेक बँकेत भरून आरोपी यांनी फिर्यादी यांना चेकची रक्कम वसुल करून घेणेची हमी दिलेली आहे.

३) यातील फिर्यादी यांनी आरोपी यांचेकडे वर नमूद दिले पैशांची मुदतीनंतर वेळोवेळी मागणी केली असता आरोपी यांनी फिर्यादी यांना रक्कम रू. ४,००,०००/— (अक्षरी रक्कम रू. चार लाख फक्त) चे दोन चेक बँकेत भरून पैसे घेणेस सांगितले व उर्वरित रक्कम रू.५०,०००/— (अक्षरी रक्कम रू. पन्नास हजार फक्त) नंतर देतो असे सांगितले. फिर्यादी यांनी सदरचे दोन्ही चेक आपले एच.डी.एफ.सी.शाखा – मुरगूड येथे त्यांचे खातेवर दि.२९/१२/२०२५ इ. रोजी भरले असता सदर दिवशी **'फंड्स इनसफिशिएंट'** या शे–यानिशी न वटता परत आले आहेत. म्हणून फिर्यादी यांनी सदरचे चेक न वटता परत आलेची आरोपी यांना कल्पना दिली असता आरोपी यानी फिर्यादी यांना सदरची रक्कम आज देतो, उद्या देतो असे म्हणून देणेस टाळाटाळ सुरू केलेली होती व आहे. त्यामुळे आरोपी

यांनी फिर्यादी यांचे कायदेशीर देय असणारे पैसे देणेस टाळाटाळ करीत आहात याची खात्री फिर्यादी यांना झालेली आहे.

४) त्यानंतर, प्रस्तूत फिर्यादी यांनी आपले वकीलांमार्फत सदरचा चेक अनादर झालेबाबतची कायदेशीर देय असणारी नोटीस दि.०१/०१/२०२६ इ. रोजी आरोपीस पाठवली. सदरची नोटीस आरोपी स्विकारत नसल्याने **'अनक्लेम्ड'** या शे–यानिशी दि.१२/०१/२०२६ इ. रोजी परत आली आहे. वरील चेकपोटीची देय असणारी रक्कम देणेची जबाबदारी कायद्याने आरोपीवर होती व आहे. त्यामुळे आरोपी हा फिर्यादी यांची कायदेशीर देय असणारी रक्कम देणार नाही अशी फिर्यादी यांना खात्री झालेली आहे. त्यामुळे फिर्यादीस आरोपीविरूद्ध सदरची फिर्याद दाखल करणे भाग पडले आहे.

५) यातील आरोपी यांनी फिर्यादी यांचेकडून कौटुंबिक अडचणीकरीता व आत्मगरजेपोटी, मुलांच्या शिक्षणासाठी हातउसणे पैसे घेवून जावून सदर रक्कमेच्या परतफेडीपोटी खोटा, बनावट चेक देवून यातील फिर्यादी यांची फसवणूक करून घोर स्वरूपाचा गुन्हा केलेला आहे.

६) **<u>सबब फिर्यादीची विनंती की,</u>**

आरोपी यांनी फिर्यादी यांचेकडून कौटुंबिक अडचणीकरीता व आत्मगरजेपोटी, मुलांच्या शिक्षणासाठी हातउसणे पैसे घेवून जावून त्या मोबदल्यात न वटणारा खोटा व बोगस चेक देवून फिर्यादी यांची घोर फसवणूक केली असलेने आरोपीस जास्तीत जास्त दंड व शिक्षा व्हावी व दंडाचे रक्कमेतून फिर्यादीस फिर्यादीची कायदेशीर देय असणारी रक्कम अगर चेकची रक्कम देणेबाबत योग्य ते आदेश व्हावेत ही नम्र विनंती.

येणेप्रमाणे फिर्यादी यांची फिर्याद असे.

कागल
दि. ०२/०२/२०२६ (फिर्यादी)
फिर्यादीचे माहितीनुसार तयार करणार व दाखल करणार

Gaikwad.

**अॅड. ए.जे.गायकवाड–पाटील**

ए. के. पाटील

## प्रतिज्ञा

मी यातील फिर्यादी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील फिर्यादीमधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल

दि.०२/०२/२०२६

ही. के. पाटील

**सोबत**

१. आरोपी याने फिर्यादी यांना दिलेलें २ चेक, चेक नं. ०१२३७० व चेक नं. ०१२३७१ दि. २९/१२/२०२५.

२. फिर्यादी यांनी चेक नं. ०१२३७० व चेक नं. ०१२३७१ एच.डी.एफ.सी. बॅक, शाखा : मुरगूड येथे भरले चेकचा बॅकेचा मेमो दि. २९/१२/२०२५

३. फिर्यादीने आरोपीस वकीलांमार्फत पाठविलेली नोटीस दि. ०१/०१/२०२६

४. फिर्यादीने आरोपीस वकीलांमार्फत पाठविले नोटीसीची पोष्टाची पावती दि. ०१/०१/२०२६

५. फिर्यादीने आरोपीस वकीलांमार्फत पाठविलेली अनक्लेम्ड या शे–यानिशी परत आलेली नोटीस दि. १४/०१/२०२६

६. फिर्यादीने आरोपीस वकीलांमार्फत पाठविले नोटीसीची पोस्टाची ऑनलाईन ट्रॅकिंग रिपोर्ट दि. ०१/०२/२०२६

MADKE AJIT BHISHMA

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA Date: 2026.02.18 17:21:34 +0530